## अर्ज निशाणी ३३ खालील आदेश

## (CNR MHSI080010922021)

०१. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०७ चंपु आप्पा विश्वासराव ही दि.२०/५/२०२२ रोजी मयत झाली आहे. तीचा विवाह झाल्यानंतर सर्वजण चंपू उर्फ चंपालता या नावानेच संबोधीत व ओळखत असत. मात्र तीचे विवाहानंतरचे नाव चारुलता आप्पा विश्वासराव असे ठेवणेत आले. दावा मिळकतीच्या सातबारा देखील प्रतिवादी क्र.७ हिचे नाव चंपु उर्फ चंपालता आप्पा विश्वासराव असेच दाखल आहे. मात्र प्रतिवादी क्र.७ मयत झाल्यानंतर तीचा मृत्यूदाखला घेतला असता सदर मृत्यूदाखल्यावर तीचे नाव चारुलता असे आहे. चंपु उर्फ चंपालता आणि चारुलता या नावाची व्यक्ती ही एकच आहे. प्रतिवादी क्र.७ ही वादीची सख्खी बहिणी आहे. तीला चंपु उर्फ चंपालता या नावानेच संबोधित असल्याने तीचे नाव दाव्यात व सातबारा सदरी चंपु उर्फ चंपालता असे नमुद झालेले आहे.

०२. प्रतिवादी क्र.०८ ते १२अ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या कथनानुसार, वर नमुद कारणाकरीता कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. सबब अर्ज, नामंजूर करण्यात यावा.

०३. प्रस्तूत दावा वादीने वाटपाकरीता दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, नमुद सातबारा व प्रस्तूत अर्जासोबत दाखल केलेले शपथपत्रातील नमुद चंपू आप्पा विश्वासराव चंपालता तीच प्रतिवादी क्र.७ हिचे मृत्यूदाखल्यावरील नाव चारुलता आप्पा विश्वासराव ही व्यक्ती एकच आहे. करीता, खालील

प्रमाणे आदेश पारित करत आहेः

– **<u>आदेश –</u>**

०१. निशाणी क्र.३३ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. सदर अर्ज नि.क्र. ३६ च्या अर्जासोबत वाचण्यात यावा.

SHUBHAM GOVIND LATURIYA Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA Date: 2025.08.14 10:49:48 +0530

स्थळ : कणकवली (शुभम जी. लटुरिया)

दिनांक : १३/०८/२०२५ न्यायाधिकारी, ग्रामन्यायालय,

वैभववाडी.